# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १७३) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंगळवार, दि.०७ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## नाशिक टीसीएस प्रकरणात निदा खानला न्यायालयाकडून जामीन

नाशिक दि.६ (प्रतिनिधी)- संपूर्ण देशाला हादरविणाऱ्या नाशिक येथील टीसीएस कंपनीतील लैंगिक शोषण, धर्मांतर आणि धार्मिक भावना दुखावणे या प्रकरणात आरोपी निदा खान हिला सोमवारी नाशिक न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. बार अ‍ॅण्ड बेंच यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

४२ दिवसांच्या शोधानंतर मे महिन्यात नाशिकमधील टीसीएस संलग्न बीपीओमधील धार्मिक धर्मांतर आणि लैंगिक छळ प्रकरणात निदा खानला अटक करण्यात आली होती. अटक झाल्यानंतर एका आठवड्याने तिने जामिनासाठी न्यायालयात धाव घेतली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका महिला सहकाऱ्याने निदा खानवर तिच्या धार्मिक भावना दुखावल्याचा आणि तिच्या धार्मिक विश्वासांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला होता. तपासादरम्यान, विशेष तपास पथकाला असं आढळून आलं की, खानने तक्रारदार महिलेसोबत पुस्तके आणि व्हिडिओंसह इस्लामिक धार्मिक साहित्य शेअर केले होते. पोलीस खानच्या मलेशियातील संबंधांचीही चौकशी करत आहेत, कारण तिने तक्रारदाराला तिथे नोकरी मिळवून देण्याचं आश्वासन दिलं होतं.

## नाशिकवर ढगफुटीचं संकट! आज त्र्यंबकेश्वर अन् सप्तश्रृंगी मंदिर भाविकांसाठी बंद; शाळा-महाविद्यालयांना सुट्टी, मुख्यमंत्र्यांच्या इशाऱ्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

नाशिक दि.६ (प्रतिनिधी)- नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरासाठी ७ जुलै रोजी ढगफुटीची दाट शक्यता वर्तवण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकाच दिवसात ३०० मिमी इतका विक्रमी पाऊस कोसळण्याचा अंदाज जाहीर केल्यानंतर संपूर्ण नाशिक जिल्हा प्रशासन हायअलर्टवर आले आहे. या संभाव्य नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी ग्रामीण पोलीस अधीक्षक डी. एस. स्वामी आणि जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तातडीची पत्रकार परिषद घेऊन मोठे निर्णय जाहीर केले आहेत. प्रवाशांच्या आणि भाविकांच्या सुरक्षेचा विचार करून आज रात्रीपासूनच त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर आणि सप्तशृंगी मंदिर परवापर्यंत भाविकांसाठी पूर्णपणे बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती देताना जिल्हाधिकारी आयुष प्रसाद म्हणाले की, "ढगफुटी पाऊस वॉर्निंग ७ जुलैला आहे, ती त्र्यंबकेश्वर, इगतपुरी आणि नाशिक-त्र्यंबकेश्वर दरम्यानच्या भागात आहे. नाशिकचा पेठ तालुका या भागातही हा इशारा आहे. नाशिक, इगतपुरी आणि त्र्यंबकेश्वर या तालुक्यात जास्त पाऊस होणार आहे. त्यामुळे नाशिक, इगतपुरी आणि त्र्यंबकेश्वर तालुक्यातील आठवडे बाजार आणि शाळा-महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांनीही उद्या शेतीच्या कामासाठी बाहेर न पडता घरीच थांबावे. खबरदारी म्हणून काही रस्ते पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहेत. आज रात्रीपासून त्र्यंबकेश्वर देवस्थान बंद राहणार असून परवापर्यंत मंदिर बंद राहील. सप्तशृंगी गड येथेही ६५ मिलिमीटर पाऊस होण्याचा अंदाज आहे, तिथे जरी जास्त पाऊस नसला तरी सुरक्षेचा उपाय म्हणून सप्तशृंगी मंदिरही बंद राहणार आहे. नद्यांचा फ्लो कायम राहील, त्यामुळे नदीपात्रात कुठे अडथळा असेल तर ते दूर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पूरग्रस्त भागातील पशुधनाचे गोठे स्थलांतरित करण्याच्या सूचना आहेत. ज्या गावांमध्ये दगड किंवा दरड पडण्याची शक्यता आहे, अशा गावांना आधीच सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद पुढे म्हणाले की, पेठ, दिंडोरी, नाशिक ग्रामीण, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी येथील शाळा आणि महाविद्यालये पूर्णपणे बंद राहतील. धबधब्यांच्या ठिकाणी विशेष सुरक्षा कर्मचारी तैनात राहतील.

तसेच छोटे पूल आणि साकव परिसरात कर्मचारी सतर्क राहणार आहेत. इगतपुरी भागातील रेल्वे विभागाला हवामानाच्या परिस्थितीबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. कोणतीही दुर्घटना घडणार नाही याची पूर्ण काळजी घेतली जात आहे. गड, किल्ले आणि धबधब्यांच्या ठिकाणी नागरिकांनी अजिबात जाऊ नये. पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन यांची कंट्रोल रूम तयार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची मदत घेतली जाणार आहे.

### मानवतेच्या दृष्टिकोनातून निर्णय घ्या; वर्क फ्रॉम होम न देणाऱ्या खासगी कंपन्यांना देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

मुंबईसह राज्यभरात तुफान पाऊस पडतो आहे. मुंबई, पुणे, नाशिक भागांमध्ये पावसाच्या सरी जोरदार पडत आहेत. तसंच पालघर, रायगड, रत्नागिरी या जिल्ह्यांमध्येही जोरदार पाऊस पडतो आहे. नाशिकमध्ये मंगळवारी ढगफुटी होण्याची शक्यता आहे. तसंच ८ जुलैपर्यंत पावसाची ही स्थिती अशीच राहणार आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आढावा बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं. तसंच वर्क फ्रॉम बाबत जो प्रश्न विचारण्यात आला त्यावरही त्यांनी उत्तर दिलं.

खासगी आस्थापना वर्क फ्रॉम होम देत नाहीत अशी स्थिती दिसते आहे असं विचारलं असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलंय की, "आपले कर्मचारी आहेत त्यांची जबाबदारी ही खासगी कार्यालयांनी, आस्थापनांनी स्वीकारली पाहिजे. आपल्या कर्मचाऱ्यांची त्यांच्या जिवीताची जबाबदारी ही सगळ्या आस्थापनांची आहे. हा मानवतेचा धर्म आहे. कुठलाही कायदा, जीआर, कुठलाही बडगा या सगळ्यापेक्षा मानवतेच्या दृष्टिकोनातून ज्यावेळी आपण अलर्ट देतो तेव्हा ही अपेक्षा आहे की सगळे त्याला योग्य प्रतिसाद देतील. अत्यावश्यक सेवा सोडून बाकीच्यांना आपण सुट्ट्या दिल्या आहेत. तरीही जर कुठे कार्यालयात बोलवण्यात येत असेल तर त्यासंदर्भातली कारवाई केली जाईल. सध्याचे अलर्ट हे ८ जुलैपर्यंतचे आहेत." असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. माझं लोकांना आजही आवाहन आहे की आवश्यक असेल तरच घराबाहेर पडा आणि तशी आवश्यकता नसेल तर घरातच थांबा. असंही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

सध्या पंढरीची वारी सुरू आहे, इंद्रायणी नदीवरील चारही पुल पाण्याखाली जात आहेत. त्यामुळे, वारकऱ्यानांही विनंती आहे, वारी ही आळंदी आणि देहुवरुन १० तारखेला पुण्यात पोहोचत आहे. वारकऱ्यांनी तिथं न जाता पुण्यात आलं पाहिजे, तिथं जाणं धोक्याचं आहे. त्यामुळे, वारकऱ्यांना विनंती आहे की देहू-आळंदीला न जाता पुण्यात यावं, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले.

## महाराष्ट्रात पावसाचं थैमान!; विविध दुर्घटनांमध्ये मागील ३-४ दिवसांत १३ जणांचा मृत्यू


मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- राज्यात सर्वदूर मोठा पाऊस कोसळत आहे. ठिकठिकाणी जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झालं आहे. मुंबईत रात्री घडलेल्या एका दुर्दैवी घटनेत चाळीचा भाग कोसळून ६ जणांचा मृत्यू झाला आहे, तर पुणे जिल्ह्यात मुसळधार पावसामुळं प्रशासनाने शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. दुसरीकडे, घाटमाथ्यावर दरड कोसळल्याने मुंबई-पुणे रेल्वे आणि रस्ते वाहतुकीला मोठा फटका बसला आहे. पुणे शहर आणि परिसरात गेल्या तीन दिवसांपासून संततधार पाऊस सुरू आहे. सुरक्षेचा उपाय म्हणून प्रशासनाने मुंबई, ठाणे, पालघर आणि पुणे जिल्ह्यातील सर्व शाळांना सुट्टी जाहीर केली असून, नागरिकांना अत्यंत आवश्यक कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पावसामुळं कर्जत आणि लोणावळा दरम्यानच्या दक्षिण-पूर्व घाट परिसरात, ठाकूरवाडी ते मंकी हिल दरम्यान रेल्वेच्या मुख्य मार्गावर दरड कोसळली आहे. यामुळे मध्य रेल्वेने या मार्गावरील अनेक लोकल आणि एक्स्प्रेस गाड्या रद्द केल्या आहेत, तर काहींचे मार्ग बदलले आहेत. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंकवरील बोगदा क्रमांक २ च्या बाहेर देखील पहाटेच्या सुमारास दरड कोसळली. सुरक्षेची खबरदारी म्हणून आज पहाटे ४ वाजेपासूनच या मार्गावरील वाहतूक इतर मार्गांवर वळवण्यात आली आहे. एकीकडे नैसर्गिक आपत्तीने राज्याला घेरले असताना, दुसरीकडे मुंबईत सुरू असलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात याचे तीव्र पडसाद उमटण्याची शक्यता आहे. राज्यातील विविध भागांत झालेल्या दुर्घटना, मुंबई-पुण्यातील वाहतूक कोंडी आणि शेतकऱ्यांचे प्रश्न यांवरून विरोधक आज सत्ताधाऱ्यांना धारेवर धरण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे आज विधिमंडळात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी पाहायला मिळू शकते.

## राज्यात पावसाचा हाहा:कार! मुंबई-गोवा महामार्ग ठप्प, मिसिंग लिंकवर दरड कोसळली, खोपोली-पेण महामार्ग पाण्याखाली

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- गेल्या काही तासांपासून कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे मुंबई-गोवा महामार्गावरुन प्रवास करणे अत्यंत धोकादायक झाले आहे. रविवारी मुंबई-गोवा महामार्गावर नागोठणे परिसरात दरड कोसळली होती. यानंतर आता दुसऱ्या दिवशी सोमवारी परशुराम घाटात मोठी दरड कोसळण्याचा धोका आहे. परशुराम घाटाच्या जवळ असलेल्या ओमेगा हॉटेलच्या शेजारी डोंगरातील माती महामार्गावर यायला सुरुवात झाली आहे. डोंगराच्या वरच्या बाजूला मोठे दगड आहेत. त्यामुळे मुंबईकडून गोव्याकडे जाणारी वाहतूक कोणत्याही क्षणी बंद होण्याची शक्यता आहे. याशिवाय, रायगड जिल्ह्यात खोपोली-पेण महामार्ग पाण्याखाली गेला आहे. सारसन ते इसांबा फाट्यावर पाणी आल्याने प्रचंड वाहतूक कोंडी आहे. हा रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. पाताळगंगा आणि भोगावती नदीने धोका पातळीच्या वर वाहत आहे. सध्या मुंबई-गोवा महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी असून अनेक गाड्या गेल्या १० ते १२ तासांपासून अडकून पडल्या आहेत.

मुंबई गोवा महामार्गावर चिपळूणच्या खवटीजवळ हॉटेल अनुसयाच्या दरम्यान भलीमोठी दरड महामार्गावर कोसळल्याने दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प झाली आहे. पहाटेपासून दरड हटवण्याचे प्रयत्न सुरु आहेत. मुसळधार पाऊस आणि अंधारामुळे दरड हटवण्याच्या कामात व्यत्यय. प्रशासनाकडून दरड हटवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. त्यामुळे मुंबई गोवा महामार्गावर दोन्ही बाजूला वाहनाच्या रांगा लागल्या आहेत.





**मिसिंग लिंकवर दरड कोसळली**

मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर नव्याने बांधण्यात आलेल्या मिसिंग लिंकवर मोठी दुर्घटना घडली आहे. मिसिंग लिंकचा स्लॅब कोसळून त्यामधून पाण्याचा लोंढा आणि माती आत शिरली. हा भयानक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. लोणावळा परिसरात सोमवारी मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. या पावसामुळे मुंबई पुणे घाटातील रेल्वे मार्गावर दरड कोसळून वाहतूक ठप्प झाली आहे. प्रशासनाने नव्या आणि जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरुन प्रवास टाळावा, असे आवाहन नागरिकांना केले आहे.

**सावित्री नदीने धोक्याची पातळी ओलांडली**

रायगड जिल्ह्याला आज आणि उद्या दोन दिवस रेड अलर्ट जारी करण्यात आलाय. त्यामुळे रायगड जिल्ह्यात कालपासून मुसळधार पावसाची बॅटिंग सुरूच आहे.. मुसळधार पावसाचा फटका दक्षिण रायगड मधील महाड शहराला बसलाय. कारण महाड शहराच्या बाजूने वाहणारी सावित्री नदीने धोका पातळी ओलांडून रौद्ररूप धारण केल आहे. सावित्री नदीच्या पुराच्या पाण्याचा विळखा महाड शहरासह आजूबाजूच्या शेतीला बसला असून महाड शहरातील अनेक बाजारपेठ परिसरात पुराचे पाणी शिरले आहे.

**साताऱ्यात ताथवडे घाटात डोंगरावरील दगड गाडीवर कोसळून झालेल्या अपघातात चालकाचा मृत्यू**

सातारा जिल्ह्याच्या फलटण तालुक्यातही पावसामुळे घाटांमध्ये धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. देवदर्शनासाठी आलेल्या चारचाकीवर फलटण तालुक्यातील फलटणपुसेगाव मार्गावरील ताथवडे घाटात कारवर दगड कोसळल्याने चालकाचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. योगेश पोपट जगताप (रा. आंबे खुर्द, बारामती) असे मृत्यू झालेल्या चालकाचे नाव आहे. या भागात पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे ताथवडे घाटात डोंगरावर सैल झालेला दगड वाहनाच्या काचेवर कोसळला. चालकाचे नियंत्रण सुटल्याने वाहन दिशादर्शक फलकावर आदळले. याची नोंद फलटण ग्रामीण पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

पालघर जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरु असून नदी नाले ओसांडून वाहायला सुरुवात झाली आहे. तर जिल्ह्यातील वैतरणा तानसा सूर्या देहेरजा पिंजाळ या नद्यांना मोठ्या प्रमाणात पूर आला असून तानसा नदीने आपली धोक्याची पातळी ओलांडलेली आहे तर वैतरणा नदी धोक्याच्या पातळीवर असून नदी काठावरील गावांमध्ये या नदीचे पुराचे पाणी शिरायला सुरुवात झाले आहे. जिल्हा प्रशासनाकडून नदी काठावरील गावांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. वैतरणा नदीला मोठा पूर आला आहे.

**सततच्या पावसामुळे इंद्रायणी नदीला पूर**

आळंदीत आज सकाळपासून मुसळधार पावसाने हजेरी लावली होती. मात्र, आता पावसाचा जोर काहीसा ओसरला असून सध्या रिमझिम पाऊस सुरू आहे. सततच्या पावसामुळे इंद्रायणी नदी दुथडी भरून वाहत असून मंदिर परिसरातही पाणी साचले आहे. दरम्यान, संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या उद्या आणि परवा पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करणार असल्याने आळंदीत हजारो वारकरी दाखल झाले आहेत. पार्श्वभूमीवर प्रशासनाने वारंवार आवाहन करत कोणत्याही परिस्थितीत इंद्रायणी नदीच्या पात्राजवळ किंवा घाट परिसरात जाण्याचा प्रयत्न करू नये, असे सांगितले आहे. याशिवाय, मुख्यमंत्री यांनीही वारकऱ्यांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. आळंदी आणि देहूकडे येण्यासाठी निघालेल्या वारकऱ्यांनी सध्याची पावसाची परिस्थिती लक्षात घेता आळंदी किंवा देहूत न येता पुण्यातूनच वारीत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहून अनावश्यक प्रवास टाळावा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्ष अलर्ट मोडवर असल्याचे विधानसभेत निवेदन



मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- राज्यातील अतिवृष्टी आणि बदलत्या नैसर्गिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाची संपूर्ण यंत्रणा सज्ज आहे. नागरिकांनी सतर्कता बाळगून अनावश्यक प्रवास टाळावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. विधानसभेत राज्यातील अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या परिस्थिती बाबत माहिती देताना मुख्यमंत्री बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, हवामानातील बदलामुळे निर्माण होणाऱ्या अतिवृष्टी, दरडी कोसळणे आणि जोरदार वाऱ्यासारख्या घटना या निसर्गाच्या बदललेल्या चक्राचा भाग आहेत. अशा परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी शासनाने पूर्वतयारी केली असली तरी काही वेळा अपेक्षेपेक्षा वेगळ्या घटना घडतात. मात्र अशा प्रत्येक परिस्थितीत महानगरपालिका, राज्य आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि संबंधित सर्व विभाग रस्त्यावर उतरून तातडीने मदतकार्य करत आहेत.

नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत धोकादायक ठिकाणी त्वरित वाहतूक वळविणे, रस्ते बंद करून पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणे, अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित परत आणणे तसेच पाण्यात अडकलेल्या वाहनांना बाहेर काढण्यासाठी मदतकार्य सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. मुख्यमंत्री यांनी सांगितले की, संभाव्य धोका लक्षात घेऊन गेल्या दोन दिवसांत धोकादायक भागांतील नागरिकांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात आले असून त्यांच्या निवासाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. मुख्यमंत्री म्हणाले की, आजचा दिवस अत्यंत महत्त्वाचा असून दुपारनंतर राज्यातील काही भागांत जोरदार वारे आणि मुसळधार पावसाचा इशारा आहे. त्यामुळे नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी, शक्यतो प्रवास टाळावा आणि कोणत्याही परिस्थितीत अनावश्यक बाहेर पडू नये. विशेषतः तरुणांना आवाहन करताना मुख्यमंत्री म्हणाले की, पावसाळी पर्यटन, धबधबे, घाट परिसर किंवा धोकादायक ठिकाणी फिरण्यासाठी जाणे पूर्णपणे टाळावे. सध्याची परिस्थिती लक्षात घेता सुरक्षिततेला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

## नीरव मोदीचे प्रत्यार्पण आता अंतिम टप्प्यात

नवी दिल्ली दि.६ (वृत्तसंस्था)- पंजाब नॅशनल बँक घोटाळ्यातील मुख्य आरोपी आणि फरार हिरे व्यापारी नीरव मोदी याची 'युरोपियन कोर्ट ऑफ ह्युमन राइट्स' मध्ये केलेली शेवटची कायदेशीर याचिका फेटाळली गेल्यामुळं नीरव मोदीच्या प्रत्यार्पणाचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नीरव मोदीकडे असलेले सर्व कायदेशीर पर्याय आता संपुष्टात आले असून, त्याला कोणत्याही क्षणी भारतात आणले जाऊ शकतं.

युरोपियन न्यायालयाने नीरव मोदीला कोणताही दिलासा देण्यास नकार दिला आहे. ब्रिटनच्या गृह मंत्रालयाने नीरव मोदीच्या प्रत्यार्पणाच्या कागदपत्रांवर आधीच स्वाक्षरी केली होती. त्यानंतर त्याने युरोपियन न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, आता तिथूनही निराशा हाती आल्यामुळे ब्रिटन सरकारकडे केवळ औपचारिकता आणि प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करणे बाकी राहिले आहे. ही प्रक्रिया पूर्ण होताच ब्रिटनचे प्रशासन त्याला भारतीय तपास यंत्रणांच्या स्वाधीन करेल.

लंडनच्या हायकोर्टाने मार्च २०२६ मध्येच नीरव मोदीची याचिका फेटाळून लावली होती. नीरव मोदीने आपल्या बचावासाठी संरक्षण क्षेत्रातील दलाल संजय भंडारी याच्या प्रकरणाचा संदर्भ दिला होता.

## लोणावळ्यात ३१ जुलैपर्यंत पर्यटकांना निर्बंध; पुणे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

पुणे दि.६ (प्रतिनिधी)- मुंबईसह पुण्यात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू असून वाहतूकव्यवस्था कोलडमडल्याचं दिसून येत आहे. पावसामुळे लोणावळा आणि मावळ तालुका परिसरात धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे पर्यटकांच्या सुरक्षेसाठी पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी लोणावळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत आदेश लागू केले आहेत. कलम १६३ म्हणजे पर्यटनावर बंदी नसून पर्यटकांसाठी सुरक्षेच्या दृष्टीने निर्बंध लावण्यात आलेत. ६ जुलै रात्री १२ वाजल्यापासून ३१ जुलै सकाळी ६ वाजेपर्यंत हे निर्बंध लागू राहणार आहेत. त्यामुळे, आता लोणावळ्यात येणाऱ्या पर्यटकांना धबधब्याच्या ठिकाणी किंवा धोकादायक पॉईंटवर जाता येणार नाही. तसेच, अशा ठिकाणी जाऊन सेल्फी काढणे किंवा व्हिडिओग्राफी, रिल्स बनवणे बंधनकार करण्यात आलंय.

लोणावळ्यातील एकवीरा देवी, भुशी धरण, लायन्स पॉईंट, टायगर पॉईंट, पवना धरण, लोहगड, विसापूर, तिकोणा, तुंग किल्ला आणि इतर पर्यटनस्थळांवर मोठ्या प्रमाणात पर्यटक येत आहेत. मात्र, अतिवृष्टीमुळे अपघातांचा धोका वाढल्याने प्रशासनाने हे निर्बंधांचे पाऊल उचलले आहे. दरम्यान, पावसाळ्यातील पर्यटनाचा आनंद घेताना जीव धोक्यात घालू नका, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेत. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

## एकाच पावसात महाराष्ट्र ठप्प! 'इमर्जन्सी' जाहीर करा, शरद पवार यांच्या पक्षाच्या सुप्रिया सुळे यांची मागणी

पुणे दि.६ (प्रतिनिधी)- राज्यात कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागात भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्याचे अधिवेशन सुरू असताना पुणे-मुंबई दरम्यानची वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. या गंभीर परिस्थितीवरून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी सरकारवर अत्यंत आक्रमक शब्दांत निशाणा साधला आहे.

"एवढे मोठे प्रकल्प करताना सरकारने पर्यावरणाचा अजिबात विचार केलेला नाही. परिणामी, अवघ्या एका पावसात संपूर्ण महाराष्ट्र पॅरलाइझ (ठप्प) झाला आहे," अशा शब्दांत सुप्रिया सुळे यांनी सत्ताधाऱ्यांचा समाचार घेतला. "सत्तेतील लोक नेहमी ७० वर्षांचा हिशोब मागतात, पण गेल्या १२ वर्षांपासून सत्तेत बसलेल्या या लोकांच्या कामाचा हिशोब कोण देणार?" असा प्रश्न उपस्थित करत सुळे यांनी गल्लीपासून दिल्लीपर्यंत सत्तेत असलेल्या भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांना चांगलेच धारेवर धरले. राज्याचे अधिवेशन सुरू असताना अशी स्थिती निर्माण होणे हे सरकारचे अपयश असल्याचे त्या म्हणाल्या.

खासदार सुप्रिया सुळे यांनी सोमवारी सकाळी महापालिकेत भेट दिली. त्यावेळी त्यांनी महापालिकेच्या वतीने सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. या बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी पावसामुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीवर भाष्य केले. त्या म्हणाल्या, पुणे-मुंबई दरम्यानची कनेक्टिव्हिटी पूर्णपणे ठप्प होणे ही अत्यंत धक्कादायक बाब आहे. हे सरकार स्वतःला 'इन्फ्रास्ट्रक्चरचे सरकार' म्हणवून घेते, पण जर त्यात जनतेची सुरक्षाच नसेल आणि पर्यावरणाचा कोणताही विचार नसेल, तर अशा कामांचा काय उपयोग?" असा संतप्त सवाल सुळे यांनी केला. सध्याच्या सद्यस्थितीत नागरिकांना प्रवास टाळण्याचे आवाहन त्यांनी केले असून मुख्यमंत्र्यांनी राज्यात तातडीने 'एमर्जन्सी' घोषित करावी, अशी मागणी केली.

विरोधी पक्षांवर नेहमी ७० वर्षांच्या कार्यकाळावरून टीका करणाऱ्या सत्ताधाऱ्यांना सुप्रिया सुळे यांनी उत्तर दिले. त्या म्हणाल्या, "गल्लीपासून दिल्लीपर्यंत आज यांचेच सरकार आहे. सत्ताधारी नेहमी ७० वर्षांचा हिशोब मागतात, पण आज महाराष्ट्राची जी दुर्दशा झाली आहे, त्यावरून यांच्या १२ वर्षांच्या कार्यकाळाचा हिशोब कोण देणार? सत्तेतील लोकांना केवळ पक्ष फोडण्यात आणि घरे फोडण्यात रस आहे. हे पाप करण्यासाठी सरकारकडे वेळ आहे, मात्र जनतेच्या सुरक्षेचे नियोजन करण्यासाठी यांच्याकडे वेळ नाही," असा टोला त्यांनी लगावला. पुण्यात पडणारी झाडे आणि विस्कळीत झालेले जनजीवन पाहता, सरकारचे नियोजन केवळ 'इन्फ्रा' आणि 'कंत्राटदारां'साठीच आहे का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

## राज्यातील पावसाच्या दुर्घटनांची उच्चस्तरीय चौकशी करा; विजय वडेट्टीवार यांची मागणी

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- राज्यभर सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मुंबईसह अनेक भागांत घडलेल्या दुर्घटनांमध्ये निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागत असल्याचा मुद्दा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सोमवारी विधानसभेत उपस्थित केला. या सर्व घटनांची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित अधिकारी आणि यंत्रणांची जबाबदारी निश्चित करावी तसेच दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी त्यांनी सरकारकडे केली.

विधानसभेचे कामकाज सुरू होताच वडेट्टीवार यांनी पावसामुळे मुंबईत घडलेल्या विविध दुर्घटनांकडे सरकारचे लक्ष वेधले. त्यांनी सांगितले की, गेल्या दोन दिवसांत मुंबईत मॅनहोलमध्ये पडणे, झाड कोसळणे आणि मानखुर्दमधील इमारत कोसळणे अशा विविध दुर्घटनांमध्ये तब्बल १२ नागरिकांचा मृत्यू झाला आहे. या घटनांमुळे प्रशासनाच्या तयारीवर आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पावसाळ्यापूर्वी धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण, धोकादायक झाडांची छाटणी, उघड्या मॅनहोलची सुरक्षितता, जलनिस्सारण व्यवस्थेची दुरुस्ती आणि आपत्कालीन परिस्थितीचा प्रभावी आराखडा तयार करण्यात आला असता, तर अनेक निष्पाप नागरिकांचे प्राण वाचू शकले असते, असे वडेट्टीवार यांनी सभागृहात नमूद केले. या दुर्घटनांमागील निष्काळजीपणाची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक असून, केवळ चौकशीच्या घोषणा करून चालणार नाही, तर संबंधित अधिकाऱ्यांवर ठोस कारवाई झाली पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली. मुंबई-पुणे मिसिंग लिंक प्रकल्प परिसरात झालेल्या दरड कोसळण्याच्या घटनेचाही वडेट्टीवार यांनी सभागृहात उल्लेख केला. या घटनेमुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली असून, जुना मुंबई-पुणे महामार्ग आणि घाट विभागातील रेल्वे वाहतुकीवरही त्याचा परिणाम झाल्याचे त्यांनी सांगितले.

# ‘शेतकऱ्याची पत्नी’ ते ‘स्वतंत्र शेतकरी’

राज्य सरकारमुळे महिला शेतकऱ्यांना आता खऱ्या अर्थाने न्याय मिळाला. शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या घरातील महिलांची आता स्वतंत्र ओळख निर्माण होणार आहे. कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या पश्चात घर चालविण्यासाठी, संसार सांभाळण्यासाठी, घरातील मुले वाढविण्यासाठी घरातील महिलांनी शेतीवरच आपल्या संसाराचा गाडा हाकला आहे. पण आता महिला शेतकऱ्यांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण झाले आहे. सरकारकडे कागदोपत्रीही उल्लेख झाला आहे. येत्या काळात या निर्णयामुळे महिला शेतकऱ्यांच्या जीवनमानामध्ये त्याचा नक्कीच सकारात्मक बदल झालेला पहावयास मिळेल.

जिच्या हाताने बी पेरले, जिच्या घामाने माती ओली झाली, जिच्या कष्टातून शेत बहरले, त्या स्त्रीला आजवर ‘शेतकरी’ म्हणण्याचाही अधिकार नव्हता’. ही वस्तुस्थिती जितकी कटू, तितकीच लाजिरवाणी होती. भारतीय शेतीच्या इतिहासात स्त्रीचे योगदान अमूल्य असतानाही तिच्या श्रमांना अधिकृत ओळख नव्हती. ती शेतात राबायची, पीक उभे करायची, जनावरांची देखभाल करायची, कुटुंबाचा संसार आणि शेतीचा गाडा एकाच वेळी ओढायची; पण सरकारी कागदोपत्री तिची ओळख फक्त ‘शेतकऱ्याची पत्नी’ इतकीच मर्यादित राहिली. तिचे हात मातीने माखलेले होते, पण तिच्या नावावर शेतकरीपणाची नोंद नव्हती. अखेर उशिरा का होईना, महाराष्ट्र सरकारने महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र ओळख देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. हा निर्णय केवळ एका नोंदणीचा विषय नाही; तो ग्रामीण स्त्रीच्या अस्तित्वाला मिळालेली अधिकृत मान्यता आहे. हा निर्णय म्हणजे अनेक दशकांच्या अन्यायावर उमटलेली दुरुस्तीची सही आहे. ही घोषणा केवळ प्रशासनाचा निर्णय नाही, तर सामाजिक परिवर्तनाचा प्रारंभ आहे.

भारतीय शेतीची खरी ताकद जर कुणी असेल, तर ती म्हणजे शेतकरी कुटुंब. त्या कुटुंबाचा सर्वात मोठा आधार म्हणजे महिला. पेरणीपासून कापणीपर्यंत, जनावरांच्या संगोपनापासून बियाण्यांच्या जतनापर्यंत, भाजीपाल्यापासून दुग्धव्यवसायापर्यंत प्रत्येक टप्प्यावर महिला आघाडीवर असते. अनेक वेळा पुरुष शहरांकडे मजुरीसाठी जातात आणि संपूर्ण शेतीची धुरा महिलांच्या खांद्यावर येते. तरीही समाजाने तिला ‘मदतनीस’ म्हणून पाहिले, ‘शेतकरी’ म्हणून नाही. ही विसंगती केवळ सामाजिक नव्हती; ती आर्थिक आणि प्रशासकीयही होती. शेतकरी म्हणून नाव नसल्यामुळे अनेक महिलांना सरकारी योजनांचा थेट लाभ मिळत नव्हता. पीकविमा, कृषी अनुदान, प्रशिक्षण, कर्ज, सल्ला, सन्मान या सर्व गोष्टींपासून त्या अप्रत्यक्षपणे दूर राहत होत्या. ज्या स्त्रीने शेती केली, तिच्याच नावावर तिचे अस्तित्व नव्हते. हा अन्याय अनेक वर्षे चालू राहिला. महाराष्ट्राने घेतलेला निर्णय या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाचा आहे. महिला शेतकऱ्यांची अधिकृत नोंद झाल्यामुळे शासनाकडे त्यांचा स्वतंत्र डेटा उपलब्ध होईल. यामुळे महिलांसाठी स्वतंत्र कृषी धोरणे आखता येतील. त्यांच्या गरजा ओळखून विशेष योजना राबविता येतील. कृषी क्षेत्रातील महिला नेतृत्वाला चालना मिळेल. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शासनाच्या दृष्टीने महिला अदृश्य राहणार नाही.

या निर्णयाचा सर्वात मोठा लाभ म्हणजे स्वाभिमान. कष्ट करणाऱ्या स्त्रीला तिच्या कामाची अधिकृत ओळख मिळणे, हा तिच्या आयुष्यातील मोठा बदल आहे. ‘मी शेतकऱ्याची पत्नी नाही, मी स्वतः शेतकरी आहे,’ हे ती अभिमानाने सांगू शकेल. या एका वाक्यात स्त्रीच्या आत्मसन्मानाचा संपूर्ण इतिहास दडलेला आहे. सामाजिकदृष्ट्या हा निर्णय ग्रामीण भागातील महिलांचे स्थान अधिक उंचावणारा ठरेल. आजही अनेक गावांमध्ये महिलांच्या श्रमाला ’कर्तव्य’ समजले जाते; त्याला आर्थिक मूल्य दिले जात नाही; परंतु अधिकृत ओळख मिळाल्यानंतर तिच्या कामाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलण्यास सुरुवात होईल. कुटुंबातील निर्णयप्रक्रियेत तिचे मत अधिक महत्त्वाचे ठरेल. शेतीसंबंधी चर्चा, पीक नियोजन, बाजारपेठ, तंत्रज्ञान यामध्ये तिचा सहभाग वाढेल. आर्थिक परिणामही तितकेच दूरगामी असतील. कृषी योजनांमध्ये थेट लाभार्थी म्हणून महिलांचा समावेश होऊ शकेल. बँकिंग, कर्ज, स्वयंरोजगार, कृषी उद्योग, प्रक्रिया उद्योग, शेतकरी उत्पादक कंपन्या, महिला बचतगट आणि कृषी उद्योजकता यांसारख्या क्षेत्रात महिलांना नव्या संधी उपलब्ध होतील. ग्रामीण अर्थव्यवस्थेत त्यांचे योगदान अधिक दृश्यमान होईल. याहूनही महत्त्वाची बाब म्हणजे भविष्यातील धोरणनिर्मिती. शासनाकडे महिला शेतकऱ्यांची अचूक माहिती असल्यामुळे कृषी विकासाचा आराखडा अधिक वास्तववादी बनू शकतो. हवामान बदल, नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेती, जलव्यवस्थापन, कृषी यांत्रिकीकरण, कौशल्य प्रशिक्षण अशा अनेक क्षेत्रांत महिलांसाठी स्वतंत्र कार्यक्रम आखण्याचा मार्ग मोकळा होईल.

या निर्णयाचा परिणाम केवळ आजच्या महिलांपुरता मर्यादित राहणार नाही. तो पुढील पिढीवरही होईल. ग्रामीण भागातील मुलींना शेती हा सन्मानाचा व्यवसाय आहे, ही भावना निर्माण होईल. शिक्षण घेतलेल्या तरुणी शेतीकडे नव्या दृष्टिकोनातून पाहतील. कृषी उद्योजकता, अन्न प्रक्रिया, जैविक शेती, डिजिटल शेती यामध्ये महिलांचे नेतृत्व वाढेल. ग्रामीण भारताच्या विकासाला नवी दिशा मिळेल. मात्र, कोणताही निर्णय कागदावरच राहिला, तर त्याचे महत्त्व कमी होते. त्यामुळे या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी होणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक पात्र महिला शेतकऱ्याची नोंद झाली पाहिजे. तिला तिच्या अधिकारांची माहिती मिळाली पाहिजे. कृषी विभाग, महसूल विभाग, ग्रामपंचायत आणि स्थानिक प्रशासनाने समन्वयाने काम केल्यास या निर्णयाचा खरा लाभ ग्रामीण महिलांपर्यंत पोहोचेल. याचबरोबर समाजालाही आत्मपरीक्षण करावे लागेल. शेतातील कष्ट फक्त पुरुषांचे असतात, ही मानसिकता बदलावी लागेल. स्त्री ही मदतनीस नाही, ती समान भागीदार आहे, ही जाणीव स्वीकारावी लागेल. महिलांचा सन्मान हा केवळ भाषणांचा विषय न राहता व्यवहारात उतरला पाहिजे.

महाराष्ट्राने घेतलेला हा निर्णय इतर राज्यांसाठीही दिशादर्शक ठरू शकतो. भारतातील शेतीचे भवितव्य महिलांच्या सहभागाशिवाय घडू शकत नाही. त्यांना सन्मान, अधिकार आणि ओळख दिल्याशिवाय कृषी विकासाची संकल्पना अपूर्ण राहील. खरे तर हा निर्णय उशिरा झाला आहे. पण इतिहासात काही निर्णय उशिरा घेतले गेले, तरी त्यांचे महत्त्व कमी होत नाही. कारण ते केवळ वर्तमान बदलत नाहीत, तर भविष्यासाठी नवा मार्ग तयार करतात. महिला शेतकरी ही आजवर भारतीय शेतीची ’अदृश्य शक्ती’ होती. आता ती अधिकृतपणे ’दृश्यमान’ झाली आहे. तिच्या नावाची नोंद सरकारी अभिलेखात झाली असली, तरी प्रत्यक्षात ती ग्रामीण समाजाच्या नव्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरली गेली आहे. शेतीला हातभार लावणाऱ्या स्त्रीला आता फक्त ओळख मिळालेली नाही, तर सन्मान मिळाला आहे. तिच्या श्रमाला नाव मिळाले आहे. तिच्या घामाला मूल्य मिळाले आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तिच्या अस्तित्वाला न्याय मिळाला आहे. यापुढे महाराष्ट्राच्या शेतात उगवणाऱ्या प्रत्येक पिकासोबत एक नवा विचारही रुजेल. ‘शेती ही स्त्री-पुरुष दोघांची समान जबाबदारी आहे, आणि शेतकरी ही ओळखही दोघांची समान आहे.’ हाच या निर्णयाचा खरा विजय आहे.

# सार्वजनिक पैसा आणि नागरिकांचे आत्मपरीक्षण

**सरकारकडून** अनेक अपेक्षा ठेवतो. चांगले रस्ते हवेत, दर्जेदार शिक्षण हवे, सरकारी रुग्णालयात उत्तम आरोग्यसेवा हवी, शेतकऱ्यांना मदत हवी, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती हवी, महिलांसाठी योजना हव्यात, ज्येष्ठ नागरिकांना आधार हवा आणि संकटाच्या काळात सरकारने तत्काळ धावून यावे, अशी आपली रास्त अपेक्षा असते. सरकारने पैसा कमी दिला तर आपण नाराज होतो. योजना उशिरा आली तर टीका करतो. लाभ मिळाला नाही तर प्रश्न विचारतो.

पण या सगळ्याच्या मध्यभागी असलेला एक साधा प्रश्न आपण फारसा विचारत नाही सरकारचा पैसा म्हणजे नेमका कोणाचा पैसा? उत्तर अगदी सोपे आहे. तो आपलाच पैसा आहे.

शासनाच्या तिजोरीत पैसा अचानक निर्माण होत नाही. नागरिकांनी भरलेले प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर, वस्तू आणि सेवांवरील कर, विविध शुल्क, शासनाच्या मालमत्तेतून मिळणारे उत्पन्न आणि इतर सार्वजनिक स्रोतांतून हा पैसा उभा राहतो. अगदी आयकर न भरणारा सामान्य नागरिकही बाजारातून एखादी वस्तू किंवा सेवा घेताना विविध प्रकारे करव्यवस्थेत योगदान देत असतो. त्यामुळे शासनाच्या तिजोरीतील पैसा कोणत्याही पक्षाचा, मुख्यमंत्र्यांचा, पंतप्रधानांचा किंवा मंत्र्यांचा वैयक्तिक पैसा नसतो. तो सार्वजनिक पैसा असतो.

मग सार्वजनिक पैशाच्या वापराबाबत जबाबदारी फक्त सरकारचीच आहे का?

सरकारने पारदर्शकता ठेवली पाहिजे. भ्रष्टाचार रोखला पाहिजे. योग्य योजना आखल्या पाहिजेत. पात्र लाभार्थी निवडले पाहिजेत. निधीचा अपव्यय होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. या सर्व अपेक्षा योग्यच आहेत. पण नागरिक म्हणून आपली काहीच जबाबदारी नाही का?

आपल्या समाजात एक वाक्य सहज ऐकायला मिळते. सरकार देत आहे तर घ्या. दुसरा म्हणतो, आपण नाही घेतले तर दुसरा कोणीतरी घेईल. तिसरा म्हणतो, सरकारचेच पैसे आहेत. याच मानसिकतेचा आपण थोडा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. सरकारचे पैसे म्हणजे शेवटी आपलेच पैसे असतील, तर गरज नसताना एखाद्या सरकारी योजनेचा लाभ घेणे म्हणजे नेमके कोणाचे नुकसान करणे?

**सरकारचे की समाजाचे?**

शासन एखाद्या योजनेसाठी ठरावीक आर्थिक तरतूद करते. कोणत्याही योजनेसाठी पैसा अमर्याद नसतो. समजा एखाद्या योजनेसाठी शंभर कोटी रुपये उपलब्ध आहेत. त्यातून खरोखर गरजू असलेल्या एक लाख नागरिकांना मदत करायची आहे. पण त्या योजनेत पात्रतेच्या पळवाटा शोधून आणखी काही हजार आर्थिकदृष्ट्या सक्षम लोक घुसले, तर उपलब्ध पैसा त्यांच्यावरही खर्च होतो. परिणामी खऱ्या गरजूंच्या वाट्याला येणारी मदत कमी होऊ शकते.

म्हणजे अपात्र असूनही सरकारी लाभ घेणारा माणूस केवळ शासनाची फसवणूक करत नाही. तो कदाचित आपल्या गावातील, आपल्या शहरातील किंवा आपल्या समाजातील एखाद्या गरजू व्यक्तीच्या वाट्याची मदत कमी करत असतो.

ही जाणीव आपल्यामध्ये किती आहे?- महिलांसाठी योजना आली की पात्रतेचा विचार करण्यापूर्वी अर्ज करण्याची घाई होते. विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती आली की आर्थिक गरज आहे की नाही, यापेक्षा ङ्गआपल्याला मिळते का?ङ्घ हा पहिला प्रश्न विचारला जातो. शेतकऱ्यांसाठी सवलत आली की आपले वास्तविक उत्पन्न आणि आर्थिक क्षमता बाजूला ठेवून कागदोपत्री पात्रता शोधली जाते. घरकुल, अनुदान, आरोग्य योजना किंवा इतर सरकारी लाभ असो. अनेकदा मला गरज आहे का? यापेक्षा मला मिळू शकते का? हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो.

हे दोन प्रश्न दिसायला जवळचे आहेत; पण त्यांच्यात मोठा फरक आहे.

मला मिळू शकते का? हा कायदेशीर किंवा प्रशासकीय प्रश्न आहे. मला खरोखर गरज आहे का? हा नैतिक प्रश्न आहे.

आपल्या सार्वजनिक जीवनातील अनेक समस्या कदाचित या दुसऱ्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्यामुळे निर्माण होत असाव्यात. आपण सरकारकडून शंभर टक्के प्रामाणिकपणाची अपेक्षा करतो. अधिकारी भ्रष्ट नसावा, मंत्री सार्वजनिक पैसा वाया घालवू नये, कंत्राटदाराने निकृष्ट काम करू नये आणि सरकारी कर्मचारी आपले काम प्रामाणिकपणे करावा, अशी आपली अपेक्षा असते. ती असलीच पाहिजे. पण स्वतःच्या बाबतीत सरकारी योजनेतील एखादी पळवाट दिसली की आपली भूमिका बदलते का?

खोटी किंवा अपूर्ण माहिती देऊन लाभ घेणे, वास्तविक उत्पन्न लपवणे, कुटुंबातील आर्थिक स्थिती वेगळी असताना कागदोपत्री पात्रता दाखवणे किंवा एकाच प्रकारच्या मदतीचा वेगवेगळ्या मार्गांनी लाभ घेण्याचा प्रयत्न करणेङ्घया गोष्टींकडे आपण अनेकदा फार गंभीरपणे पाहत नाही.

उलट असे करणाऱ्या व्यक्तीला काही वेळा हुशार किंवा चलाख म्हटले जाते. त्याला सगळ्या योजना माहिती आहेत.

तो सरकारी कामात हुशार आहे.

कुठून काय मिळवायचे हे त्याला बरोबर कळते. ही वाक्ये कौतुकाने बोलली जातात. पण हीच हुशारी जर एखाद्या गरजूच्या वाट्याचा पैसा कमी करत असेल, तर तिचे कौतुक करायचे की आत्मपरीक्षण?

सरकारचीही मर्यादा आहे. प्रत्येक नागरिकाच्या घरात जाऊन त्याची वास्तविक आर्थिक परिस्थिती तपासणे कोणत्याही शासनयंत्रणेला शक्य नाही. कागदपत्रे एक सांगतात आणि प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी असू शकते. जमीन एका व्यक्तीच्या नावावर, उत्पन्न दुसऱ्याचे, व्यवसाय तिसऱ्याचा आणि सरकारी लाभ चौथ्या व्यक्तीच्या नावावर असू शकतो. संयुक्त कुटुंब आणि मालमत्तेच्या विभागणीमुळे काही परिस्थिती स्वाभाविकही असतात. त्यामुळे प्रत्येक प्रकरणाकडे संशयाने पाहणे योग्य नाही.

पण जाणीवपूर्वक व्यवस्थेतील पळवाटांचा वापर केला जात असेल, तर केवळ सरकारने पकडले नाही म्हणून ते योग्य ठरत नाही. कायदा आणि नैतिकता यांच्यात हाच फरक आहे.

वाहतूक पोलीस नाही म्हणून लाल दिवा तोडणे योग्य ठरत नाही. तिकीट तपासनीस नाही म्हणून विनातिकीट प्रवास योग्य होत नाही. त्याचप्रमाणे सरकारी यंत्रणेला आपली वास्तविक परिस्थिती समजली नाही म्हणून गरज नसताना सरकारी लाभ घेणे योग्य ठरत नाही.

आज तंत्रज्ञानामुळे परिस्थिती बदलत आहे. विविध शासकीय माहिती प्रणाली एकमेकांशी जोडल्या जात आहेत. आधार, बँक खाती, जमीन नोंदी, कराशी संबंधित माहिती आणि विविध योजनांच्या लाभार्थी नोंदी यांचा कायदेशीर चौकटीत अधिक प्रभावी वापर भविष्यात होईल. त्यामुळे चुकीची माहिती देऊन लाभ घेणे अधिक कठीण होईल.

**पण प्रत्येक समस्या तंत्रज्ञानाने सुटेल का? –** शासनाने आणखी एक संगणकीय प्रणाली तयार केली, आणखी एक पडताळणी सुरू केली आणि आणखी काही कागदपत्रे मागितली, तर त्याचा त्रास अनेकदा खऱ्या गरजू व्यक्तीलाच अधिक होतो. हुशार आणि माहिती असलेला माणूस नवीन मार्ग शोधतो. गरीब, अल्पशिक्षित आणि प्रशासकीय प्रक्रियेची माहिती नसलेला नागरिक मात्र आणखी एका कागदपत्रासाठी कार्यालयाच्या फेऱ्या मारतो. म्हणून प्रत्येक सरकारी योजनेभोवती संशयाची आणि कडक पडताळणीची भिंत उभी करणे हा एकमेव उपाय असू शकत नाही. समाजाचा प्रामाणिक सहभागही आवश्यक आहे.ज्याला मदतीची खरोखर गरज नाही, त्याने स्वतःहून मागे राहणे हीदेखील सामाजिक सेवा आहे. त्यासाठी व्यासपीठावर भाषण करण्याची गरज नाही. देणगी देण्याचीही गरज नाही. फक्त आपल्या वाट्याला येऊ शकणारा पण आपल्याला आवश्यक नसलेला सरकारी लाभ न घेणे, हीदेखील एका गरजू व्यक्तीला केलेली अप्रत्यक्ष मदत ठरू शकते.

आपल्या मुलांना आपण प्रामाणिकपणा शिकवतो. शाळांमध्ये मूल्यशिक्षण दिले जाते. महापुरुषांच्या विचारांवर भाषणे होतात. भ्रष्टाचाराविरोधात घोषणा दिल्या जातात. पण सार्वजनिक पैसा आणि सरकारी योजना यांच्याबाबत वैयक्तिक प्रामाणिकपणाची चर्चा किती होते?

कदाचित आता ती सुरू झाली पाहिजे.

गावातील ग्रामसभेत, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये, महिला बचत गटांमध्ये, शेतकरी बैठकीत आणि सामाजिक संस्थांमध्ये एक साधा विचार मांडला पाहिजेङ्घसरकारी योजना म्हणजे मोफत मिळणारा पैसा नाही. तो समाजाने समाजासाठी उभा केलेला पैसा आहे.

त्यावर पहिला हक्क सर्वाधिक गरजू व्यक्तीचा असला पाहिजे. आपल्याला पात्रता आहे म्हणून प्रत्येक लाभ घेणे आवश्यक नसते. एखाद्या योजनेचा लाभ न घेतल्याने आपण मूर्ख ठरत नाही. उलट आपल्यापेक्षा अधिक गरजू व्यक्तीसाठी सार्वजनिक निधीत आपला छोटासा वाटा शिल्लक ठेवत असतो.

सरकारला प्रश्न विचारलेच पाहिजेत. सार्वजनिक पैशाचा हिशेब मागितलाच पाहिजे. भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवलाच पाहिजे. कारण लोकशाहीत सरकार नागरिकांना उत्तरदायी आहे. पण सरकारला प्रश्न विचारताना स्वतःलाही एक प्रश्न विचारला पाहिजे.

मी सार्वजनिक पैशाशी
किती प्रामाणिक आहे?

सरकारने काय केले, अधिकारी काय करतात आणि राजकारणी किती प्रामाणिक आहेत, यावर आपण तासन्तास चर्चा करतो. कदाचित कधीतरी स्वतःच्या वर्तनाचाही छोटासा हिशेब मांडला पाहिजे.

कारण सार्वजनिक पैसा वाचवण्याची जबाबदारी फक्त अर्थमंत्र्यांची नाही. ती प्रत्येक नागरिकाची आहे. शासनाची तिजोरी म्हणजे शेवटी समाजाची तिजोरी आहे. त्या तिजोरीतील एक रुपयाही चुकीच्या व्यक्तीकडे गेला, तर कुठेतरी एखाद्या गरजूच्या वाट्याचा एक रुपया कमी होतो.

म्हणून सार्वजनिक पैशाच्या चर्चेत सरकारचे परीक्षण आवश्यक आहेच; पण नागरिकांचे आत्मपरीक्षणही तितकेच आवश्यक आहे. शेवटी एकच प्रश्न मला हा लाभ मिळू शकतो का? असे विचारण्यापूर्वी मला या लाभाची खरोखर गरज आहे का? असे आपण स्वतःला विचारू शकतो का?

– डॉ. भारत कऱ्हाड,
प्राचार्य, वराडकर महाविद्यालय
दापोली, जिल्हा रत्नागिरी.

# नागरिक गुलाम नाहीत!

## लोकशाहीला दिलासा देणारा मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय

**लोकशाहीची** खरी ताकद सत्तेत नसते, तर ती नागरिकांच्या स्वातंत्र्यात असते. सरकार बदलतात, पक्ष बदलतात, विचारधारा बदलतात; पण संविधानाने नागरिकांना दिलेले मूलभूत अधिकार बदलत नाहीत. म्हणूनच न्यायव्यवस्था ही केवळ कायद्याची नव्हे, तर लोकशाहीची अंतिम संरक्षक मानली जाते. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माधव जे. जामदार यांनी दिलेल्या अलीकडील निर्णयाने हीच घटनात्मक भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. हा निर्णय केवळ एका व्यक्तीच्या हद्दपारीचा नाही; तर नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, आंदोलनाच्या अधिकाराचा आणि संविधानाच्या सर्वोच्चत्वाचा पुनरुच्चार करणारा आहे. हे प्रकरण सय्यद अहमद अब्दुल वाहिद चौधरी यांच्या हद्दपारीशी संबंधित होते. सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया (डउझख) या नोंदणीकृत राजकीय पक्षाचे पदाधिकारी म्हणून त्यांनी केंद्र सरकारच्या काही निर्णयांविरोधात मोर्चे, आंदोलने आणि धरणे आयोजित केली होती. या आंदोलनांशी संबंधित प्रामुख्याने भारतीय दंड संहितेच्या कलम १८८ अंतर्गत गुन्हे दाखल झाल्यानंतर त्यांच्यावर महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम ५६ अंतर्गत हद्दपारीची कारवाई करण्यात आली.
मात्र न्यायालयाने संपूर्ण नोंदी तपासल्यानंतर स्पष्ट शब्दांत नमूद केले की, सरकारच्या निर्णयांविरोधात आंदोलन करणे, घोषणाबाजी करणे किंवा निषेध व्यक्त करणे यामुळेच एखाद्या व्यक्तीच्या हालचाली समाजासाठी धोकादायक ठरतात, असा कोणताही पुरावा प्रशासनाकडे नव्हता. त्यामुळे अधिकाऱ्यांनी नोंदवलेले तथाकथित डीलक्षशलींळींश डरींळीषरलींळेप कोणत्याही ठोस पुराव्याअभावी कायद्याच्या कसोटीवर टिकू शकत नाही. न्यायमूर्ती माधव जे. जामदार यांनी आपल्या लेखी निर्णयात स्पष्ट नमूद केले की, सरकारच्या काही निर्णयांना विरोध केल्यामुळेच एखाद्या नागरिकाला हद्दपार करणे हे संविधानाच्या कलम १९ अंतर्गत असलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या आणि कलम २१ अंतर्गत सन्मानाने जगण्याच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन आहे. ही नोंद केवळ एका याचिकाकर्त्याला दिलासा देणारी नाही; तर भारतीय लोकशाहीच्या मूल्यांवर न्यायालयाने उमटवलेली ठाम मोहोर आहे.

या निर्णयासाठी न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या अनुराधा भसीन विरुद्ध युनियन ऑफ इंडिया या ऐतिहासिक निर्णयाचा आधार घेतला. त्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते की, लोकशाहीतील वैध मतप्रदर्शन, आंदोलन किंवा तक्रारी दडपण्यासाठी कायद्याचा वापर करता येत नाही. गुजरात उच्च न्यायालयाच्या तत्सम निर्णयाचाही संदर्भ देत मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, सरकारविरोधी भूमिका घेणे हा गुन्हा नाही. सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती जामदार यांनी केलेली काही तोंडी निरीक्षणेही देशभर चर्चेचा विषय ठरली. ङ्गसरकारच्या निर्णयांविरोधात नागरिकांनी आंदोलन करू नये का?ङ्घ, ङ्गप्रत्येक आंदोलनावर गुन्हे दाखल करून नागरिकांना सरकारचे गुलाम बनवले जात आहे का?, ‘भाजप सरकार मुर्दाबाद’ किंवा ‘अमित शाह मुर्दाबाद’ अशा घोषणा दिल्या म्हणून एखाद्याला हद्दपार कसे करता येईल?ङ्घअसे प्रश्न त्यांनी उपस्थित केले. ही निरीक्षणे अंतिम लेखी आदेशाचा भाग नसली, तरी त्यातून व्यक्त झालेली घटनात्मक भूमिका लोकशाहीच्या आरोग्याबाबतची गंभीर चिंता व्यक्त करणारी आहे. लोकशाहीत सरकारवर टीका करणे म्हणजे राष्ट्रद्रोह नव्हे. सरकार म्हणजे राष्ट्र नाही आणि सत्ताधारी पक्ष म्हणजे संविधानही नाही. सत्ताधाऱ्यांवर प्रश्न विचारण्याचा अधिकार जिवंत असेल, तरच लोकशाही जिवंत राहते. अन्यथा विरोधी मत दडपण्याची प्रवृत्ती हळूहळू लोकशाहीचा गळा घोटू लागते. हद्दपारी हा कायद्यातील अत्यंत कठोर आणि अपवादात्मक उपाय आहे. एखादी व्यक्ती समाजासाठी प्रत्यक्ष धोका निर्माण करत असल्यासच त्याचा वापर व्हावा, अशी कायद्याची अपेक्षा आहे. परंतु केवळ आंदोलनाचे आयोजन केले, घोषणा दिल्या किंवा शासनाच्या धोरणांचा विरोध केला म्हणून हा उपाय वापरणे म्हणजे कायद्याच्या उद्देशालाच हरताळ फासणे होय. या निर्णयातून पोलीस प्रशासनालाही एक स्पष्ट संदेश मिळतो. कायद्याची अंमलबजावणी करताना राजकीय भूमिका नव्हे, तर घटनात्मक मूल्ये आणि वस्तुनिष्ठ पुरावे महत्त्वाचे असतात. नागरिकांचे अधिकार मर्यादित करण्यासाठी प्रत्येक कारवाई कायद्याच्या कठोर कसोटीवर टिकली पाहिजे.

या निर्णयाकडे कोणत्याही एका पक्षाच्या विजय-पराभवाच्या चष्म्यातून पाहणे योग्य ठरणार नाही. आज एका विचारसरणीच्या कार्यकर्त्याला न्याय मिळाला, उद्या दुसऱ्या विचारसरणीच्या व्यक्तीलाही हाच घटनात्मक आधार लागू होईल. कारण न्यायालये पक्षांच्या नव्हे, तर संविधानाच्या बाजूने उभी असतात. आजच्या काळात मतभेदांना संशयाने पाहण्याची प्रवृत्ती वाढताना दिसते. परंतु मतभिन्नता ही लोकशाहीची कमजोरी नसून तिची सर्वात मोठी ताकद आहे. प्रश्न विचारणारा नागरिक हा शत्रू नसतो; तो लोकशाहीचा जागरूक प्रहरी असतो. मुंबई उच्च न्यायालयाचा हा निर्णय म्हणूनच एका व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही. तो प्रत्येक भारतीयाला आठवण करून देतो की, भारतामध्ये सत्ता संविधानापेक्षा मोठी नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततापूर्ण आंदोलन आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार हे कोणत्याही सरकारच्या कृपेवर अवलंबून नसून संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार आहेत. जेव्हा न्यायालये या अधिकारांच्या संरक्षणासाठी निर्भयपणे उभी राहतात, तेव्हा केवळ एका नागरिकाला न्याय मिळत नाही; तर संपूर्ण लोकशाहीला नवजीवन मिळते. लोकशाहीचा श्वास पुन्हा मोकळा होतो आणि संविधानावरील जनतेचा विश्वास अधिक दृढ होतो. अशा निर्णयांमुळेच न्यायालये ही लोकशाहीची अखेरची आशा असल्याची भावना अधिक बळकट होते.

**– प्रवीण बागडे**
नागपूर

# !!! आंतरराष्ट्रीय सहकारी दिनाचा इतिहास !!!

**‘जागतिक सहकारी दिवस विशेष.)**

**दि.१६ डिसेंबर १९९२ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने ठराव ४७/९० मध्ये घोषित केले. जुलै १९९५चा पहिला शनिवार आंतरराष्ट्रीय सहकारी दिवस म्हणून घोषित केला गेला, जो आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडीच्या स्थापनेच्या शताब्दी निमित्त आहे. सन १९९५पासून संयुक्त राष्ट्रसंघाचा आंतरराष्ट्रीय सहकारी दिन संयुक्तपणे आंतरराष्ट्रीय सहकाराच्या पुढाकाराने साजरा होऊ लागला. आंतरराष्ट्रीय सहकारी दिन हा सन १९२३पासून आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडीद्वारे जुलै महिन्याच्या पहिल्या शनिवारी साजरा केला जाणारा सहकारी चळवळीचा वार्षिक उत्सव आहे. ही रोचक माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या या लेखातून जाणून घेउया... संपादक**

जगभरातील सहकारी संस्था हा दिवस विविध पद्धतीने साजरा करतात आणि दरवर्षी आयोजक संस्था उत्सवासाठी एका थीमवर सहमत असतात. बीजिंग प्लॅटफफॉर्म फॉर ॲक्शनच्या १५व्या वर्धापन दिनानिमित्त सन २०१०ची थीम कोऑपरेटिव्ह एंटरप्राइज महिलांना सक्षम बनवते, अशी होती. यावर्षी ६ जुलै हा दिवस सहकार चळवळीतील योगदानावर प्रकाश टाकण्यासाठी साजरा केला जात आहे. सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासासाठी सहकार संस्था सामंजस्याने कशा प्रकारे कार्य करतात याबद्दलही या निमित्ताने जनजागृती केली जाते.

युनायटेड नेशन्स जनरल असेंब्ली- युएनजीएने दि.१६ डिसेंबर १९९२ रोजी जुलै १९९५चा पहिला शनिवार आंतरराष्ट्रीय सहकार दिन म्हणून घोषित करण्याचा ठराव मंजूर केला. आंतरराष्ट्रीय सहकार आघाडीच्या स्थापनेची शताब्दी म्हणून ही तारीख निवडण्यात आली. याला कूप्स डे असेही म्हणतात. आंतरराष्ट्रीय सहकार दिन, आंतरराष्ट्रीय सहकार आघाडीची स्थापना आणि जगाला एक चांगले स्थान बनवण्याच्या दिशेने सहकार संस्था कशा प्रकारे कार्य करतात, याचा उत्सव साजरा करतात. आंतरराष्ट्रीय सहकार दिन उपक्रम आणि चर्चा आयोजित करून साजरा केला जातो. यामध्ये विविध सहकार संस्थांचे कार्य दर्शविणाऱ्या लघुपटांच्या स्क्रीनिंगचा समावेश आहे. या दिवशी रेडिओ कार्यक्रम, वर्तमानपत्रे आणि इतर विविध माध्यमांचा वापर या क्षेत्रातील उपलब्धींवर प्रकाश टाकण्यासाठी केला जातो. सामुदायिक स्तरावर त्यांचे लक्ष असूनही, सहकारी संस्था त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक मॉडेलचे फायदे जगभरातील लोकांपर्यंत पोहोचवण्याची आकांक्षा बाळगतात. त्यांच्या मते, जागतिकीकरणामुळे वाढलेली संसाधनांची असमानता, संपत्तीचे अधिक शाश्वत वितरण होण्यासाठी मूल्यांच्या संचाद्वारे नियंत्रित करणे आवश्यक आहे.

सहकार चळवळ ही लोकशाही आणि स्थानिक पातळीवर स्वायत्त आहे. त्याच वेळी, सहकार संस्थांना जागतिक स्तरावर संघटना आणि उपक्रमांची संघटना म्हणून एकत्रित केले जाते जेथे नागरिक सामाजिक, पर्यावरणीय आणि आर्थिक उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी स्वयं-मदतीवर अवलंबून असतात. आंतरराष्ट्रीय सहकार दिनाची मूल्ये अशी- सहकार संस्था स्वयं-जबाबदारी, लोकशाही, समानता, स्वायत्ता, स्व-मदत आणि एकता यांसारख्या अनेक मूल्यांचे पालन करतात. ही तत्त्वे त्यांच्या यशस्वी कार्यासाठी आवश्यक आहेत. सहकार चळवळ ही लोकशाही आणि स्थानिक पातळीवर स्वायत्त आहे. त्याच वेळी, सहकार संस्थांना जागतिक स्तरावर संघटना आणि उपक्रमांची संघटना म्हणून एकत्रित केले जाते जेथे नागरिक सामाजिक, पर्यावरणीय आणि आर्थिक उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी स्वयं-मदतीवर अवलंबून असतात.

!! विश्व सहकारी दिन निमित्त सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**– संकलन व सुलेखन –**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना; सुलभ, सोपी आणि पारदर्शक कार्यपद्धती




**पुण्यश्लोक** अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ केले जाणार आहे. त्यासाठीची कागदपत्रांची पडताळणी, पात्रता निकषांप्रमाणे लाभार्थ्यांची माहिती संकलित करणे इ. कार्यवाही सुरु झाली आहे. शेतकरी बंधू भगिनींनी एक बाब लक्षात घेतली पाहिजे की, आपण ज्या संस्थेमार्फत कर्ज घेतले आहे, त्या विविध कार्यकारी सेवा सोसायटी, बँका, सहकारी बँक, कृषी पतसंस्था इ. मार्फत आपल्या कर्जमुक्तीची प्रक्रिया सुरु आहे. त्यामुळे आपणास या कर्जमुक्तीसंदर्भात हवी असलेली सर्व माहिती व आवश्यक प्रक्रिया ही तेथेच होईल. त्यामुळे चुकीची, अनावश्यक व दिशाभूल करणाऱ्या माहितीपासून आपण सावध असणे आवश्यक आहे.

ही कार्यपद्धती पूर्णपणे सुलभ, पारदर्शक आहे. त्यासाठीची सर्व प्रक्रिया संबंधित बँका वा ज्या संस्थेमार्फत कर्ज घेण्यात आले आहे त्या संस्थेमार्फत राबविली जाणार आहे. शेतकऱ्यांनी फक्त त्या संस्थेने मागणी केल्यानुसार कागदपत्रे वेळेत द्यावयाची आहेत. संबंधित बँकेकडे असलेली शेतकऱ्यांची माहिती अद्ययावत असणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी संबंधित बँकेतून आपला कर्ज खात्याचा तपशील तपासावा. कर्जाचा प्रकार, कर्जाची रक्कम, खाते क्रमांक, आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक इ. नोंदी बरोबर असल्याची खात्री करावी.

आधार कार्ड, आधार क्रमांकाशी संलग्न बँक खाते क्रमांक,मोबाईल क्रमांक, बँक पासबुक, कर्ज खात्याचा तपशील, कर्ज खाते क्रमांक, सातबारा उतारा (७/१२), आवश्यकतेनुसार आठ-अ उतारा (८अ), अ‍ॅग्रीस्टॅक नोंदणीची माहिती, ई-केवायसी पूर्ण झाल्याची नोंद इ.

आधार प्रमाणीकरण आणि अ‍ॅग्रीस्टॅक नोंदणी या दोन बाबी अत्यंत आवश्यक आहेत. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी अद्याप अ‍ॅग्रीस्टॅकवर नोंदणी केली नाही, त्यांनी ती तातडीने पूर्ण करावी. तसेच आधारशी जोडलेला मोबाईल क्रमांक हाच बँकेशी जोडलेला असावा याची खात्री करण्यासाठी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी. ही सर्व प्रक्रिया संबंधित बँका आणि शासनाच्या यंत्रणांकडून पुर्ण केली जाईल. पात्र कर्ज खात्यांची पडताळणी केली जाईल. माहितीची छाननी करून पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात येईल.

शेतकऱ्यांनी आपल्या बँकेशी नियमित संपर्क ठेवावा. बँकेकडून प्राप्त माहितीवर विश्वास ठेवावा. बँकेतच आवश्यक कागदपत्रे द्यावीत. अन्य कुणाही व्यक्तीस वा दलालास आपली कागदपत्रे देऊ नये. कोणत्याही अफवा किंवा अवैध संदेशांवर विश्वास न ठेवता शासन, संबंधित बँका, कृषी विभाग आणि महसूल यंत्रणेकडून देण्यात येणाऱ्या अधिकृत माहितीलाच प्राधान्य द्यावे.

**-संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

# सेवा करार पध्दतीने विवक्षित नियुक्ती छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजनेचा प्रकल्प मातीस मिळवतील -जेष्ठ जल अभ्यासक राजेंद्र दाते पाटील

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) - प्रतिनिधी-छत्रपती संभाजीनगर शहरा साठी असलेली नविन पाणी पुरवठा योजने बाबत प्रशासनाने दिलेल्या आदेशा विरुद्ध वागुन आणि एवढेच काय तर कंत्राटदार जे. व्ही. पी. आर हे सातत्याने प्रशासनाच्या सुचना गांभीर्याने घेत नाहीत.त्यात सेवा निवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित नियुक्ती म्हणजे स्व: हाताने हा प्रकल्प मातीस मिळवतील असे स्पष्ट मत जेष्ठ जल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केले आहे.

मुळात ज्यांच्या नियुक्तीचा डाव आखल्या जात आहेत, त्या सगळ्यांना प्रशासनाने या ना त्या कारणाने विभागीय चौकशीत पाणी पुरवठा उपक्रमात दोषी असल्याचे अहवाल स्पष्ट सांगत असतांना त्यांचा परत सेवेत घेण्याचा डाव कोणासाठी व कशासाठी आखला जात आहे ? या मागे कोणाचा दबाव आहे? हे प्रशासनाने गांभीर्याने लक्षात घ्यावे. नसता आम्हाला या बाबत रीतसर शासना कडे दाद मागावी लागणार असुन मनपा मध्येच कार्यरत असणाऱ्या सेवा निवृत्त अधिकाऱ्यां च्या सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी घेण्या बाबतची जाहिरात मनपा प्रशासनाने तात्काळ जनहितार्थ रद्द करावे अशी सुद्धा मागणी त्यांनी केली आहे.


वास्तवीक पाहता समस्त शहर वासियांना कंत्राटदार यांचे सह पीएमसी व इतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रशासनिक अधिकाऱ्यांना मुर्ख बनवत आहेत. असे प्रतिपादन उच्च न्यायालया समोर जनहीत याचीके द्वारे जनतेची बाजु मांडणारे जेष्ठ जल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी प्रतिपादन केले असुन कॉफर डॅमचा विषय घ्या,अथवा पाईप लाईन अंथरणे,जागा निवडणे,सर्ज टॅंक, पाण्याच्या शहर भरात उभ्या करावया च्या ५२ पेक्षा जास्त टाक्यांची जागा असे अनेक तांत्रिक विषय मनपा आणि शासनाने अजूनही विचारात घेतले तर खुप गतिमान स्थिती होऊन किंवा हैड्रोलीक टेस्टिंग शिवाय देयके अदा करू नये अशी बाब असो किंवा निविदा पी एम सी म्हणजे प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्ट असुन नसल्या सारखी असुन करोडो रुपयांची देयके जमा करण्या शिवाय काही एक काम करीत नसुन अशी निष्क्रीय यंत्रणा कशा साठी पोसल्या जात आहेत ?

असा परखड सवाल शासना समोर सातत्याने जेष्ठ जल अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी खुप पूर्वीच उपस्थित केलेला असुन घडत असलेल्या सर्व बाबी म्हणजे शहर वासियांना पाण्यापासुन वेठीस धरण्याचा प्रकार असुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे स्वतः राज्यातील इतर पाणी पुरवठा प्रकल्पात पीएमसी म्हणुन कार्यरत इथे मात्र इथे नव्याने पी एम सी नेमला असुन ही उधळपट्टी कशा साठी ? बोलता बोलता तीन हजार कोटी प्रकल्प किंमत ओलांडणाऱ्या

आणि त्या पेक्षा मोठ्या असलेल्या प्रकल्पास' यशच अपयश ' मिळवुन देईल असे अनेक वेळा जेष्ठ जल अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद केलेले असुन उदाहरण द्यावयाचे झाल्यास जालना अंबड पाणी पुरवठा योजनेच्या पाईप लाईनला मजीप्रा म्हणजे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आत मधून अस्तरीकरण केले नव्हते लोकांच्या 'पाणी द्या पाणी द्या ' या घाईमुळे ते तसेच राहून गेले आणि तीन वर्षानंतर जल वाहिनीला पत्रा पातळ होऊन छिद्र पडण्यास सुरुवात झाली. त्यामुळे अशा प्रकारची घाई करणे अत्यंत चुकीचे आहे.घाई करूनही छत्रपती संभाजी नगर शहराला पाणी भेटत नाही हे विशेष. या घाईच्या नादामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण भविष्यात उद्भव विहिरी समोरील संपूर्ण बंधारा तोडणार नाही, वास्तविक पाहता तो बंधारा तोडने अत्यंत आवश्यक आहे. कारण की ते तात्पुरते बांधकाम असते. पाण्याच्या घाईमुळे मातीच्या बंधाऱ्या याशिवाय सिमेंटच्या पाईल टाकून अतिरिक्त बंधारा मजीप्रा ने बांधला आणि महानगरपालिकेच्या बोकांडी तो जास्तीचा खर्च पडलेला आहे. त्या बंधाऱ्या पुढे विहिरीत पाणी येण्या साठी चॅनल देखील करावयाचा आहे. त्यापूर्वीच घाई घाईमुळे सायफन पद्धतीने पाणी घेतले. आता ती पद्धत देखील दोन दिवस चालली आणि बंद पडली. पुन्हा त्या सायफन पद्धतीचा खर्च वाया गेला. त्यामुळे तरंगते पंप टाकून पाणी घेण्याचा प्रयत्न आहे. म्हणजे सगळं ' ट्रायल अँड एरर ' म्हणजेच शेखचिल्ली सारखी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची गत झाली आहे.

आता पहा ना कंत्राटदार आणि

संबधित महाराष्ट्र प्रशासन सामाजीक बांधिलकी अजीबात लक्षात घेत नसुन या प्रकल्पात पेच निर्माण करीत असल्याचे आणि त्यात भरीस भर म्हणजे सेवानिवृत्तअधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित नियुक्ती करण्याची प्रसिद्ध केलेली जाहीरात अंत्यन्त अयोग्य असुन प्रशासनाने ही जाहीरात जनहितार्थ तात्काळ परत घ्यावी अशी महत्वाची जनहितार्थ मागणी जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी प्रशासना समोर केली आहे.आणि हे सेवानिवृत्त विवक्षित पद्धतीने महानगर पालिकेत आले तर त्यांनी पाणी पुरवठ्या मध्ये किती काळ सेवा केली आहे आणि त्यांना पाणीपुरवठ्याचा काय अनुभव आहे हे देखील गृहीत धरणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत त्यांनी प्रदर्शित केले. विवक्षित पद्धतीने येणारे हे अभियंते महिन्याला ८० ते ९०हजार पगार महानगर पालिके कडून घेतील आणि महानगरपालिकेचा कुठलाही आर्थिक फायदा न होता महानगरपालिका पर्यायाने नागरिकांना भुर्दंड सहन करावा लागणार आहे हे निश्चित.



निवृत्त संचालक कोषागरे (महाराष्ट्र शासन) आणि प्रसिद्ध साहित्यिक श्री रवींद्र धोंगडे यांच्या 'माणूसगाथा' या कविता संग्रहाचे प्रकाशन रविवार दिनांक २८ जून २०२६ रोजी पुणे येथे सर्वश्री व्यंकटराव गायकवाड (नि. सचिव, जलसंपदा), शेखर गायकवाड (अतिरिक्त महासंचालक, यशदा, चंद्रकांत दळवी,( नि. आयुक्त, पुणे विभाग व चेअरमन, रयत शिक्षण संस्था, उमाकांत दांगट ( नि. आयुक्त औरंगाबाद विभाग) यांच्या हस्ते झाले.

# जैन टॅग तर्फे विद्यार्थ्यांसाठी मोफत जादूच्या कार्यक्रमाचे आयोजन

छत्रपती ७ (प्रतिनिधी) - छत्रपती सभाजीनगर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणे, त्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देणे आणि शिक्षणासोबत मनोरंजनाचा सुंदर संगम घडवून आणण्याच्या उद्देशाने जैन टॅग तर्फे ७ जुलै रोजी दोन शाळांमध्ये मोफत जादूच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या अंतर्गत नवजीवन स्कूल येथे सकाळी १०:३० वाजता आणि पी. यू. जैन स्कूल येथे दुपारी २:३० वाजता आकर्षक जादूच्या प्रयोगांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ शेकडो विद्यार्थी घेणार असून, त्यांना आनंदासोबत प्रेरणादायी अनुभवही मिळणार आहे. द्यावेळी जैन टॅग च्या अध्यक्षा सौ. जयश्री लोहाडे म्हणाल्या,'मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य हीच आमच्यासाठी सर्वात मोठी प्रेरणा आहे. शिक्षणासोबत आनंद, सर्जनशीलता आणि सकारात्मक विचारांची जोड मिळावी, या हेतूने हा उपक्रम आयोजित केला आहे या कार्यक्रमासाठी प्रोजेक्ट चेअरमन रचना पहाडे कीर्ती पाटनी मिताली काला सपना पाटनी सारीका बडजाते दिपाली पाडे यानी समाजहितासाठी असे उपक्रम भविष्यातही सातत्याने राबविण्याचा जैन टॅग चा संकल्प केला आहे. समाजोपयोगी, शैक्षणिक आणि संस्कारक्षम उपक्रम सातत्याने राबवत असून, भविष्यातही विद्यार्थी, महिला आणि समाजाच्या हितासाठी विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेतर्फे देण्यात आली.

# पैठणला आज ५० हजार वारकऱ्यांची होणार 'चरणसेवा'

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) - वारकऱ्यांच्या सेवेसाठी जिल्ह्यात एका स्तुत्य उपक्रम होणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, छत्रपती संभाजीनगर च्या वतीने ७ जुलै रोजी पैठण येथील संत एकनाथ मंदिरात 'चरणसेवा' उपक्रम होईल.

मा. मंत्री श्री. अतुलजी सावे आणि मा. आमदार विलासजी भुमरे यांच्या नेतृत्वात मुख्यमत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने या स्तुत्य उपक्रमाचे नियोजन केले आहे. या उपक्रमात एम जी.एम स्कूल ऑफ फ़िजिओथेरपी व शिवा ट्रस्ट संस्थेचे शेकडो वैद्यकीय विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून सेवा करणार आहे. या उपक्रमाच्या नियोजनाची जबाबदारी श्री. गजानन झोल, श्री श्याम क्षीरसागर, श्री. गजानन कांबळे आदींवर आहे. मुख्यमंत्री श्री. देवेन्द्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि कक्ष प्रमुख डॉ. रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम होत असल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी गोरे यांनी दिली.




**ठळक वैशिष्ट्य -** संत एकनाथ महाराज पालखी सोहळ्याच्या प्रस्थाना सोबत किमान ५० हजार वारकरी याचे लाभार्थी असतील.

**आयुर्वेदिक मालिश :** पायी प्रवासामुळे पायांवर येणारा ताण कमी करण्यासाठी स्वयंसेवक वातशामक आयुर्वेदिक तेलाचा वापर करून पायांची मालिश करतील.

**आरोग्य तपासणी व सुविधा :** वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्ला दिला जाईल.

# छतावरील सौरऊर्जेस प्रोत्साहनासाठी छत्रपती संभाजीनगरात फिरणार 'सूर्यरथ'

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) - 'पीएम-सूर्यघर' मोफत वीज योजनेत जास्तीत जास्त घरांवर सौरऊर्जा पॅनेल बसवण्यास प्रोत्साहन देण्यासाठी ६ जुलै २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगरमध्ये सूर्यरथ' या फिरत्या जनजागृती मोहिमेस प्रारंभ होणार आहे.

महावितरणच्या मिल कॉर्नर येथील परिमंडल कार्यालयात सकाळी ११ वाजता खासदार संदीपान भुमरे यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन होईल. 'नॅशनल सोलर एनर्जी फेडरेशन ऑफ इंडिया'द्वारे पीडब्ल्यूसी आणि एनर्जिवा व्हेंचर्स यांच्या सहकार्याने हा 'सूर्यरथ' सुरू केला जात आहे. ही मोहीम शासनाच्या 'पीएम-सूर्य घर मोफत वीज योजना'चा एक भाग आहे. छतावरील सौरऊर्जा प्रणालीद्वारे १ कोटी घरांना मोफत वीज उपलब्ध करून देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

'नॅशनल सोलर एनर्जी फेडरेशन ऑफ इंडिया'चे मुख्य कार्यकारी अधिकारी सुब्रह्मण्यम पुलिपाका म्हणाले, 'छतावरील सौरऊर्जा प्रणाली बसवण्याची मोठी क्षमता असल्याने छत्रपती संभाजीनगरची निवड या मोहिमेसाठी विशेष शहर म्हणून करण्यात आली आहे. 'सूर्यरथ' नागरिकांपर्यंत पोहोचेल, त्यांना याचे फायदे समजावून सांगेल आणि सौर पॅनेल बसवण्याच्या प्रक्रियेची माहिती देईल.'

उद्घाटनानंतर हे वाहन सात दिवस छत्रपती संभाजीनगर शहरात फिरेल आणि रेल्वे स्टेशन, सेव्हनहिल, सूतगिरणी चौक, गजानन महाराज मंदिर रोड, बळीराम पाटील विद्यालय, ज्युबली पार्क, महानुभाव मंदिर, शहाबाजार, आझाद चौक तसेच ग्रामीण भागातील बाजारपेठा, रुग्णालये, शाळा, महाविद्यालये आणि निवासी परिसरांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी थांबेल. हे फिरते वाहन मोफत सल्ला, सौर तंत्रज्ञानाचे प्रदर्शन आणि योजनेअंतर्गत उपलब्ध असलेल्या अनुदानाची व आर्थिक पर्यायांची माहिती देईल. एखादे घर या प्रणालीसाठी पात्र आहे का हे तपासण्यासाठी आणि बसवण्याबाबतच्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी तज्ज्ञ तिथे उपलब्ध असतील.

७ जुलैपासून १० दिवसांसाठी क्रांती चौक उड्डाणपुलाखाली सौरऊर्जेबाबत जनजागृती करणारा कक्ष (बूथ) उभारला जाईल. येथे नागरिक पीएम-सूर्यघर मोफत वीज योजनेच्या माहितीसाठी तज्ज्ञ आणि विक्रेत्यांशी संपर्क साधू शकतील तसेच नोंदणी प्रक्रियेची सविस्तर माहिती घेऊ शकतील.

घरगुती वीजबिल कमी करणे आणि २०३० पर्यंत ५०० गिगावॅट अक्षय ऊर्जा निर्मितीचे भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यास हातभार लावणे हे सरकारच्या या 'रूफटॉप सोलर' (छतावरील सौरऊर्जा) योजनेचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

# भाजप राजस्थान प्रकोष्ठ व महिला प्रकोष्ठाची द्वितीय कार्यकारिणी बैठक उत्साहात संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) - भारतीय जनता पक्षाच्या राजस्थान प्रकोष्ठ व महिला प्रकोष्ठाची द्वितीय कार्यकारिणी बैठक रविवारी खडकेश्वर येथील हॉटेल कृष्णा इन येथे विविध सामाजिक, धार्मिक व संघटनात्मक उपक्रमांवर सखोल मंथन करत आगामी कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले.

बैठकीच्या प्रारंभी राजस्थान प्रकोष्ठाचे माजी उपाध्यक्ष स्वर्गीय नरेश सुरग यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर आषाढी एकादशीनिमित्त प्रसाद वितरण, शासकीय कागदपत्र शिबिर, रक्तदान शिबिर, अयोध्या यात्रा, समाज पालकमंत्री कार्ययोजना तसेच 'पंचतत्त्व' या सांस्कृतिक कार्यक्रमाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. विविध उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रकल्पप्रमुखांचीही नियुक्ती करण्यात आली.

बैठकीस सोमनाथ तांबी, जगदीश जांगिड, सीए नंदकिशोर मालपाणी, हरीओम राठोड, विपीन गुजराणी, योगेश भाटी, दीपक फुलबाती, सागर पांडे, पुनम चंद सुराणा, ऋषी दायमा, सुदर्शन जाजू, निलेश मित्तल, धर्मेंद्र जांगिड, जयप्रकाश खंडेलवाल, संजय मंत्री, ललिता करवा, वनिता नाटाणी, दीपाली भराडिया, चंचल करवा, चंदा वर्मा, ज्योती अपूर्वा, विद्या शर्मा, अर्चना चांगल, भावना जोशी, लक्ष्मी गुप्ता, अंकिता अग्रवाल, किरण रोडा, मंजू खंडेलवाल यांच्यासह प्रकोष्ठाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीचे सूत्रसंचालन महिला प्रकोष्ठाच्या अध्यक्षा ललिता करवा यांनी केले, तर सरचिटणीस सोमनाथ तांबी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# गांधी पुतळा ते अप्पा हलवाई: आखाड्याची माती अन् पेढ्यांचा गोड इतिहास!

छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी)-

'ये शहर नहीं, एक जिंदा किताब है,
हर गली का यहाँ अपना एक ख्वाब है।
खोलो इतिहास के पन्नों को जरा अदब से,
यहाँ का हर जर्रा, कला का नायाब नमुना है।

गांधी पुतळा ते अप्पा हलवाई या मार्गावर आयोजित केलेल्या या हेरिटेज वॉकमध्ये छत्रपती संभाजीनगरच्या हृदयात वसलेल्या शहागंज, सराफा, धावणी मोहल्ला आणि पानदरीबा परिसराचा रंजक इतिहास उलगडत गेला. निमित्तही तितकेच खास होते - शहागंज येथील ऐतिहासिक गांधी पुतळ्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाची सुरुवात आणि शीख पंथाचे आदरणीय भाई दयासिंहजी यांचे ३६५ वे जयंती वर्ष! या दुग्धशर्करा योगायोगाने या वॉकला एक वेगळीच उंची प्राप्त करून दिली.

**विठ्ठलाची पाऊले, उदासी आखाडा अनब गुरुद्वारी घुमला भक्तीचा गजर!**

इतिहासाची पाऊलखुणा शोधत निघालेला हा जथा जेव्हा शहराच्या गजबजलेल्या भागातून फिरला, तेव्हा जुन्या काळातील वैभव डोळ्यांसमोर जिवंत झाले. या सफारी दरम्यान भाविकांचे आणि इतिहासप्रेमींचे श्रद्धास्थान असलेल्या खालील प्रमुख ठिकाणांना भेटी देण्यात आल्या: **विठ्ठल मंदिर:** शहरातील सर्वात जुने आणि प्राचीन मंदिर, जिथे शांततेचा अनुभव आला.

**उदासी आखाडा:** जुन्या काळातील साधू-संतांच्या वास्तव्याची आणि परंपरेची साक्ष देणारी जागा.

भाई दयासिंहजी गुरुद्वारा: शीख पंथाचा पवित्र इतिहास आणि सेवाभावाची शिकवण देणारे अध्यात्मिक केंद्र.

**बाखरिया आखाडा: मातीचा सुवास आणि कुस्तीची परंपरा**

या वॉकचा सर्वात थरारक आणि मराठमोळा अनुभव ठरला तो म्हणजे उस्ताद बाबूलालजी बाखरिया यांच्या कुस्ती आखाड्याला दिलेली भेट! लाल मातीचा सुवास आणि अंगात संचारणारे स्फुरण घेऊन सर्व इतिहासप्रेमी या आखाड्यात पोहोचले.

**आखाड्याची गाथा अन ऐश्वर्याच्या शब्दांतील शौर्याचा ऐतिहासिक ठेवा!**

यावेळी ऐश्वर्या बाखरिया यांनी उपस्थितांशी संवाद साधताना आखाड्याचा इतिहास अत्यंत ओघवत्या आणि प्रभावी भाषेत मांडला. त्यांनी कुस्तीच्या आखाड्यातील एक-एक वैशिष्ट्य, डावपेच, लाल मातीची महती आणि बाखरिया उस्तादांची परंपरा उपस्थितांना अत्यंत सुंदररीत्या समजावून सांगितली. ऐश्वर्या यांच्या अभ्यासपूर्ण सादरीकरणामुळे आखाड्यातील जुन्या मल्लांचे पराक्रम आणि कुस्तीची वैभवशाली परंपरा उपस्थितांच्या डोळ्यांसमोर हुबेहूब उभी राहिली, ज्याने सर्वांची मने जिंकून घेतली.

महापौर समीर राजूरकर म्हणाले, 'छत्रपती संभाजीनगरचा इतिहास, संस्कृती आणि वारसा ही आपल्या शहराची खरी ओळख आहे. हेरिटेज वॉकसारख्या उपक्रमांमुळे नव्या पिढीला आपल्या शहराचा समृद्ध इतिहास प्रत्यक्ष अनुभवता येतो. वारसा जपणे ही केवळ प्रशासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. अशा उपक्रमांमधून आपल्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक वारशाबद्दलचा अभिमान अधिक दृढ होईल.' मान्यवरांची उपस्थिती आणि मार्गदर्शन या ऐतिहासिक उपक्रमाला शहराच्या प्रथम नागरिकांसह अनेक दिग्गजांची साथ लाभली. प्रमुख उपस्थिती: छत्रपती संभाजीनगरचे महापौर समीर राजूरकर, नगरसेवक सचिन खैरे, ऋषिकेश जैस्वाल, नगरसेविका कीर्ती शिंदे, उप आयुक्त अंकुश पांढरे, नंदकिशोर भोंबे यांच्यासह अनेकानी या वॉकला उपस्थित राहून वारसा जतन करण्याच्या मोहिमेचे कौतुक केले.

# फळपीक विम्यासाठी १४ जुलैपर्यंत मुदतवाढ

## हवामानाच्या जोखमीपासून संरक्षणासाठी शेतकऱ्यांना दिलासा;मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी)- प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत संत्रा, मोसंबी, डाळिंब, चिकू, पेरू, लिंबू, द्राक्ष आणि हळद या पिकांसाठी विमा भरण्याची अंतिम मुदत १४ जुलै २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. शासनाची मंजुरी उशिरा मिळाल्यामुळे ही मुदतवाढ देण्यात आली असून, अधिकाधिक शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय कृषि सहसंचालक सुनिल वानखेडे यांनी केले आहे.

सन २०२६-२७ या वर्षासाठी छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांमध्ये ही योजना लागू करण्यात आली आहे. हवामानातील प्रतिकूल बदलांमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीपासून फळबागांचे संरक्षण करण्यासाठी ही योजना महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

शेतकरी पीक विमा पोर्टलद्वारे स्वतः, आपले सेवा केंद्र, विमा प्रतिनिधी किंवा बँकेच्या माध्यमातून अर्ज करू शकतात. योजनेत कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक सहभागाची संधी असून, डिजिटल पीक सर्वेक्षण (DCS), AgriStack F$armer ID, आधार संलग्न बँक खाते आणि फळबागेचे जिओ-टॅगिंग अनिवार्य करण्यात आले आहे.

योजनेअंतर्गत कमी पाऊस, पावसाचा खंड, अतिवृष्टी, जास्त तापमान, आर्द्रता आदी हवामान धोक्यांपासून विमा संरक्षण मिळणार असून, अधिसूचित हवामान केंद्रांवरील नोंदीच्या आधारे नुकसानभरपाई अदा करण्यात येणार आहे.

संत्रा, मोसंबी, डाळिंब, चिकू, पेरू, लिंबू, द्राक्ष व हळद उत्पादक शेतकऱ्यांनी १४ जुलैपूर्वी, तर सिताफळ उत्पादकांनी ३१ जुलैपूर्वी विमा योजनेत सहभागी होऊन या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

